आर.सी.सी. क्र.४१८/२०२२

नि.क्र.४६

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – शरद नारायण बाबर

वय – ५० वर्षे, व्यवसाय – शेती

रा. – वडनेर, ता.पारनेर

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. ए. पटेकर यांचेमार्फत–**

मयुर व हनुमंत बाबर हे माझे चुलत भाऊ आहेत. फिर्यादी माझी भावजय आहे. मला घटना घडलेली माहीत नाही. आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन तिचा विनयभंग केल्याचे मला माहीत नाही. घटनेबाबत फिर्यादीने फिर्याद दिल्याबाबत मी तपास केला नाही. घटनेबाबत पोलीसांनी मला फोन केला नव्हता. पोलीसांनी माझा जबाब घेतला नव्हता.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उलट तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना देण्यात आली. सबब उलटतपास सुरु.**

हे म्हणणे खरे आहे की आरोपी हनुमंत माझ्या घरासमोर राहतो व मयुर सेनेत आहे. दि.७.९.२०२२ रोजी मयुर सुट्टीनिमीत्त गावी आल्याचे मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यादिवशी मला आरोपी व फिर्यादी यांच्या भांडणाचा आवाज आला होता. हे मला माहीत नाही की भांडणामध्ये मयुर बाबर फिर्यादीस म्हणाला होता की तु येथे यायचे नाही तुझे घर जेसीबीने पाडीन. हे म्हणणे खरे नाही की आरोपी हनुमंत याने फिर्यादीस शिवीगाळ केली होती. हे मला सांगता येणार नाही की फिर्यादीने आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की या घटनेसंदर्भात दि.८.९.२०२२ रोजी पारनेर पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. आता मला माझ्या पोलीसांसमोरील अधोरेखांकीत भाग अ दाखवण्यात आला. तसा मजकुर पोलीसांनी का लिहीला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपींशी आमचे संबंध चांगले रहावेत म्हणुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास  आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एम.एल. औटी यांनी नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.11.21 11:06:15 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः२०/११/२०२५.                    न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पारनेर

आर.सी.सी. क्र.४१८/२०२२

नि.क्र.४४

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – जालींदर किसन निचीत

वय – ५८ वर्षे, व्यवसाय – शेती

रा. – वडनेर, ता.पारनेर

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. ए. पटेकर यांचेमार्फत–**

पोलीसांनी मी जात असताना मला बोलावले व सही करण्यास सांगितले. माझ्यासमोर पोलीसांनी काही केले नाही. मी फक्त सही केली व निघुन गेलो. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला.त्यावर अ.क्र.१ वर माझी सही असुन त्यात काय लिहीले आहे हे माहीत नाही. पंचनाम्यावरील सहीस ओळखीसाठी **नि.४५** देण्यात येते.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उलट तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना देण्यात आली. सबब उलटतपास सुरु.**

हे म्हणणे खरे आहे की दि.८.९.२०२२रोजी सकाळी ९.२०ते ९.४० वाजता पोलीसांनी मला फिर्यादीच्या घराजवळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी माझ्यासोबत संदीप बाबर व मंगल बाबर हजर होते. हे मला माहीत नाही की त्यावेळी पोलीस फिर्यादीने सांगितलेल्या घटनेप्रमाणे पंचनामा लिहुन घेत होते. हे मला माहीत नाही की सदर पंचनामा फिर्यादीचा विनयभंग झाल्यासंदर्भात होता. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा व नकाशा तयार करुन तोमला वाचुन दाखवुन त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की मी पंचनाम्यास हजर असुनही केवळ आरोपीस मदत व्हावी या हेतुने खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एम.एल. औटी यांनी नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.11.21 11:06:24 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः२०/११/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पारनेर